डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ व सलंग्न संस्थेतील सुधारीत वेतनश्रेणीत वेतन घेणा-या अधिकारी कर्मचा-यांना दि.१ जानेवारी,२०१८ ते दि. ३० सप्टेंबर,२०१८ या कालावधीतील महागाई भत्याची थकबाकी देण्याबाबत.

# डॉ .पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

## अर्थ प्रशासन विभाग

---

वाचा : १) या विभागाचे आदेश.क्र. मभवा/निमवा/२०१८-१९/१२०९,दि.२९ ऑक्टोंबर, २०१८.
२) वित्त विभाग शासन निर्णय.क्र. मभवा-२०१८/ प्र.क्र.१८/सेवा-९,दि.२९ ऑक्टोंबर, २०१८.
३) वित्त विभाग शासन निर्णय.क्र. निमवा-२०१८/ प्र.क्र.२५२/ सेवा-४, दि.२९ ऑक्टोंबर, २०१८.

## आदेश

जा.क्र. अप्रवि/मभवा/निमवा/२०१८-१९/1223 दि. २९/१०/ २०१८.

उपरोक्त आदेश क्र. १ नुसार दि.०१ ऑक्टोंबर, २०१८ पासून मुळ वेतन अधिक ग्रेड वेतन/ निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतन यांच्या एकूण रकमेवर ३ % दराने महागाई भत्ता वाढ मंजूर केली आहे म्हणजेच त्यावेळच्या १३९% महागाई भत्त्या ऐवजी वेतनाच्या/ निवृत्ती वेतनाच्या / कुटूंब निवृत्ती वेतनाच्या १४२% महागाई भत्ता वाढ मंजूर केली आहे.

शासन निर्णयाच्या अनुषंगाने विद्यापीठातील व विद्यापीठाशी संलग्न अनुदानित संस्थाती अधिकारी / कर्मचा-यांना व निवृत्ती वेतन/ कुटूंब निवृत्तीवेतन धारकांना सदर महागाई भत्त्याची वाढ दि. १ ऑक्टोंबर, २०१८ पासून लागू करण्यात आलेली आहे. आता संदर्भ २ व ३ शासन निर्णयान्वये १ जानेवारी ,२०१८ ते ३० सप्टेंबर,२०१८ या नऊ महिन्यांच्या कालावधीतील अनुज्ञेय महागाई भत्त्याच्या थकबाकीची रक्कम माहे ऑक्टोंबर,२०१८ च्या वेतनासोबत रोखीने देण्यात यावी.

सदरहू महागाई भत्त्याची थकबाकी माहे ऑक्टोंबर -२०१८ चे नियमित वेतन, निवृत्ती वेतन वेतन देयकात रोखीने अदा करावी किंवा त्या पुढील नियमित मासिक वेतन देयकात समावेश करावा मात्र याबाबत पुरवणी देयक सादर करु नये अशी पुरवणी देयके पारीत केली जाणार नाहीत. महागाई भत्ता वाढीच्या थकबाकी अनुषंगाने होणारा वाढीव खर्च हा सन २०१८-१९ चे मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

भा.कृ.अ.प. योजनांतर्गत सन २०१८-१९ करीता वेतन अनुदानाची मागणी करतांना संबंधीत कार्यान्वयन अधिका-यांनी प्रस्तुत महागाई भत्ता थकबाकी विचारात घेऊन त्यानुसार वेतन अनुदानाची मागणी करावी. द्वितीय सहामाही करीता अनुदानाची मागणी यापुर्वी केलेली असल्यास महागाई भत्त्याच्या थकबाकी तरतुदीसाठी स्वतंत्र वाढीव मागणी प्रस्ताव सबंधित कार्यान्वयन अधिका-यांनी भा.कृ.अ.प.स त्वरीत सादर करावा.

Uspawar
नियंत्रक
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला

प्रति: १) नियंत्रण अधिकारी (सर्व) / आहरण व संवितरण अधिकारी (सर्व) / विभागप्रमुख(सर्व),डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला.
____________________________________________
२) प्राचार्य____________________________________________.
३) अधिदान व लेखा अधिकारी, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला/ नागपूर.
यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.
निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतन धारकांना वरील कालावधीची महागाई भत्ता थकबाकी रक्कम रोखीने माहे ऑक्टोंबर -२०१८ देय नोव्हेंबर -२०१८ चे नियमित मासिक निवृत्ती वेतन देयकात प्रदान करण्यात यावी. महागाई भत्ता अदा करण्यासाठी निवृत्ती वेतन अथवा वेतनाचे स्वतंत्र पुरवणी देयके आपण पारीत करु नये.

नियंत्रक